246

ISSN 2319-4766

On The Occasion of Centenary Birth Anniversary Year of
Hon. Dr. Shankarraoji Chavan
&
Silver Jubilee Years of Globalization of Indian Economy
A One Day National Level Conference
On

# GLOBALIZATION & ITS IMPACT ON INDIAN ECONOMY (GIIE 2020)

Date: 8th February 2020

Organized by

P. G. & Research Department of Economics
Yeshwant Mahavidyalaya, Nanded
(NAAC Reaccredited at 'A' Level (III Cycle) with 3.29 CGPA)
(College with Potential for Excellence - CPE)

In Collaboration with
S. R. T. M. University, Nanded

Special Issue of
An International, Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES
JAN-MAR, 2020, V-8/46

Editor In Chief
Principal Dr. G. N. Shinde

Editor
Dr. P. R. Muthe

Co-editor's

Dr. D. D. Bhosale

Dr. D. A. Pupalwad

23/35
249


| | | |
|---|---|---|
| 14 | जागतिकीकरण आणि भारतातील विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक<br>*कदम राम भोजु* | 61-64 |
| 15 | जागतिकीकरणाचा भारतीय कृषी क्षेत्रावर झालेला परिणाम<br>*प्रा. डॉ. विलास तुळशीराम ठाकूर* | 65-67 |
| 16 | जागतिकीकरणाचा गुंतवणूक आणि आयात निर्यातीवरील परिणाम<br>*प्रा. डॉ. बी. के. शिंदे* | 68-71 |
| 17 | जागतिकीकरण आणि त्याचा भारतीय अर्थव्यवस्थेतील रोजगारावरील परिणाम<br>*डॉ.प्रा.एम.एम.गायकवाड व प्रा.राहुल ल.लिंगम्पल्ले* | 72-75 |
| 18 | जागतिकीकरणाचा भारताच्या विपणनावरील परिणाम<br>*डॉ.लता कमलापुरे* | 76-79 |
| 19 | जागतिकीकरणाचा भारतीय कृषी क्षेत्रावरील परिणाम<br>*डॉ.एस.एस. पतंगे* | 80-85 |
| 20 | जागतिकीकरणाचे शेती कृषी व उद्योग क्षेत्रावरील परिणाम<br>*डॉ.रामचंद्र भिसे* | 86-90 |
| 21 | जागतिकीकरणाचा कृषी क्षेत्रावरील परिणाम<br>*प्रा.डॉ.कदम माधव रामजी व प्रा.साईचरण व्यंकटेश पेंडकर* | 91-95 |
| 22 | जागतिकीकरणाचा भारतीय लघूउद्योगावरील परिणाम<br>*पाटील सुलक्षणा भारत* | 96-100 |
| 23 | जागतिकीकरणाचा भारताच्या आर्थिकस्थितीवर झालेला परिणाम<br>*प्रा.उध्दव निर्वळ* | 101-105 |
| 24 | जागतिकीकरण आणि भारतीय कृषी क्षेत्र<br>*डॉ.सीमा विश्वनाथराव भोसले* | 106-112 |
| 25 | दुरशिक्षण आणि जागतिकीकरण<br>*चंद्रकांत सुरेश पवार* | 113-116 |
| 26 | भारतातील बॅकिंग क्षेत्रावरील जागतिकरणाचा प्रभाव<br>*प्रा. ज्ञानेश्वर आनंदराव पुपलवाड* | 117-121 |
| 27 | भारतीय बॅर्कींग क्षेत्रावर जागतिकरणाचा प्रवाह<br>*प्रा. डॉ. रत्नाकर रामराव कांबळे व कसबे अश्विनी नागोराव* | 122-127 |
| 28 | ***भारताची मुक्त अर्थव्यवस्थेकडे वाटचाल. जागतिकीकरण एक संदर्भ***<br>***प्रा डॉ दिगंबर रोडे*** | 128-136 |
| 29 | जागतिकीकरणानंतर पीक पध्दतीत झालेला बदल<br>*शिवकुमार केशवराव पांचाळ* | 137-142 |

SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES ISSN: 2319-4766

# जागतिकीकरणाचे शेती कृषी व उद्योग क्षेत्रावरील परिणाम

**डॉ.रामचंद्र भिसे**

*समाजशास्त्र विभागप्रमुख, दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर जि.नांदेड*

**प्रस्तावना** : जागतिकीकरण हा सध्याच्या काळातील अगदी परवलीचा शब्द बनला आहे. जागतिकीकरण ही एक प्रक्रिया आहे.या प्रक्रियेचा संबंध जसा आर्थिक घटकांशी निगडित आहे तसाच तो सामाजिक व भौगोलिक इत्यादी अनेक घटकांशी निगडीत आहे. जागतिकीकरण ही बहुआयामी संकल्पना आहे. जागतिकीकरणामुळे भारतात नवयुगाला सुरूवात झाली. १९९१ नंतर भारताच्या आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक जे बदल झालेले आपल्याला दिसतात त्यामागे जागतिकीकरणच जबाबदार मानले जाते. भारतीय समाजातील होणाऱ्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक बदलातून निरनिराळे प्रश्न किंवा आव्हाने निर्माण होता. अशा बदलास कारणीभूत असणारी प्रक्रिया म्हणूनच जागतिकीकरणाकडे बघावे लागेल. मुळात भारतातील एकंदरीत परिस्थिती, मानसिकता जागतिकीकरणास अनुसरून नसून सुद्धा पूर्ण झाली आहेत. जागतिकीकरणाची कल्पना कमी—अधिक प्रमाणात आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेतून राष्ट्राच्या समाजाच्या तसेच व्यक्तीच्या जडणघडणीमध्ये काही संधी निर्माण केल्या जातात. जागतिकीकरण एक बहूआयामी प्रक्रिया म्हणून ओळखली जाते. जागतिकीकरण केवळ संकुचित आर्थिक व्यवहार प्रक्रिया नसून ती एक व्यापक सामाजिक व सांस्कृतिक देवाण—घेवाण प्रक्रिया सुद्धा मानली जाते. जागतिकीकरण हा अतिशय व्यापक विचार, विस्तृत व कार्यक्षेत्र असणारा बहुअंगी, बहुआयामी विषय आहे.

- **जागतिकीकरण म्हणजे काय ?**

**१) आंतरराष्ट्रीय मुद्रा निधी (IMF) च्या मते,** ''जागतिकीकरण म्हणजे वस्तू व सेवा आंतरराष्ट्रीय अतिजलद व प्रसरण पावणारे तंत्रज्ञान ह्यांचे वाढते प्रमाण तसेच विविधता ह्या सहाय्याने जगातील देशांचे सतत वाढत जाणारे परस्परालंबित्व होय.'' १९९०—९१ मध्ये भारतापुढे परकीय टंचाई निर्माण झाली. या स्थितीतून बाहेर काढण्यासाठी १९९१ मध्ये पंतप्रधान पी.व्ही.नरसिंहराव व अर्थमंत्री डॉ. मनमोहनसिंग यांनी भारतात नवीन आर्थिक धोरण जाहीर केले त्याचे परिणाम विशेषत: जागतिकीकरणाचे भारताच्या शेती, उद्योग, सेवा, वाहतूक, रोजगार पारंपरिक व्यवसाय इत्यादीवर झाले, परंतु या ठिकाणी आपण आर्थिक, सामाजिक ही परिणाम अभ्यासणार आहोत.

- **संशोधन समस्या व तिचे स्वरूप :**

१ जानेवारी २०२० ला भारत जागतिकीकरणामध्ये सहभागी होऊन २५ वर्षे पूर्ण झालेली आहेत. या २५ वर्षाच्या काळात भारतातील कृषी, उद्योग, सेवा या अर्थव्यवस्थेच्या तीन्ही क्षेत्रांवर तसेच रोजगार, नागरीकरण, सामाजिक, सांस्कृतिक जीवन, पर्यावरण इत्यादींवर काय इष्ट—अनिष्ट परिणाम झालेले आहेत याचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते. संशोधक म्हणून मी या ठिकाणी जागतिकीकरणाचे भारतावरील विविध परिणामांचा आढावा या शोधनिबंधामध्ये घेतला आहे.

ISSN: 2319-4766
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

- **संशोधनाची उद्दिष्टे :**

१) जागतिकीकरणाचे कृषी क्षेत्रावरील परिणाम अभ्यासणे.

२) जागतिकीकरणाचे उद्योग क्षेत्रावरील परिणाम अभ्यासणे.

३) जागतिकीकरणाचे सेवा क्षेत्रावरील परिणाम अभ्यासणे.

- **संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग करण्यात आला. त्याचप्रमाणे प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी द्वितीयक तथ्यांचा आधार घेण्यात आला आहे.

जागतिकीकरणाचा अर्थव्यवस्थेच्या कृषी, उद्योग व सेवा क्षेत्रावरील परिणामांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**१) कृषी क्षेत्रावरील परिणाम :** भारत हा कृषीप्रधान देश आहे आजही भारतातील जवळपास ६५% लोकसंख्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या कृषी क्षेत्राशी निगडीत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत म्हणजेच राष्ट्रीय उत्पादनात कृषी क्षेत्राचा हिस्सा १७% आहे. जागतिकीकरणाच्या प्रभावाने सर्व देश व्यापाराच्या सामायिक बाजारात उतरले आहेत. कृषी मालाचा पुरवठा वाढल्याने कृषीमालाचे भाव एकदम कमी होतात. याचा फटका अविकसित देशांना बसतो. यावर उपाय म्हणून WTO ने कृषी कराराची संकल्पना मांडली. सन १९९५ पासून खऱ्या अर्थाने कृषी क्षेत्रात जागतिकीकरणाचा स्वीकार करण्यात आला. सन १९९४ पूर्वी गॅट करारातील तरतूदी कृषी क्षेत्रासाठी लागू नव्हत्या परंतु २४ एप्रिल १९९४ रोजी मॉरकेश या मोरॉक्को देशातील शहरात झालेल्या जागतिक व्यापार करारात प्रथमच शेती क्षेत्राचा समावेश करण्यात आला.

- **अनुकूल परिणाम :**

**१) बाजार प्रवेश :** कृषी व्यापारातील विपर्यास टाळण्यासाठी 'कोटा' पद्धत बंद करून कृषिमालाला बाजारात प्रवेश मिळवून द्यावा याबाबत कृषी करार करण्यात आला. बाजार प्रवेश मिळण्यासाठी कृषिमालावरील आयातशुल्कात विकसित देशांनी १९९५ पासून ६ वर्षांत ३६% तर विकसनशील देशांनी १९९५ पासून १० वर्षात २४% कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला. कृषी करारातील 'बाजारप्रवेश' संबंधित बंधने भारतावर लागू झाले नाहीत. व्यवहारातील प्रतिकूल असल्यामुळे भारताला या करारात सवलत मिळाली १९९९ पर्यंत भारताने पुढील घटकांवर उच्चतम दर निर्धारित केले. (१) प्राथमिक कृषी उत्पादने १००% (२) प्रक्रिया खाद्यवस्तू १५०%, (३) खाद्यतेले ३००%.

**२) अनुदान :** 'देशांतर्गत मदत' या उपबंधान्वये भारत विशिष्ट मदत म्हणून केवळ 'किमान आधारभूत किंमत' अंतर्गत अनुदान देतो. २५ पिकांसाठी आधारभूत किंमत जाहीर केली जाते. ही मदत अंबरबॉक्स अंतर्गत दिली जाते. गैरवस्तू विशिष्ट मदत विचारात घेतल्यास भारतात खते, पाणी, बियाणे, कृषिकर्ज, वीज यासाठी सबसिडी दिली जाते. भविष्यात विकसित देशांनी अधिक दबाव टाकल्यास कृषी करारातील कलमांमध्ये फेरफार होऊ शकतात. भारताला १०% पर्यंत सबसिडी देण्यास परवानगी आहे. भारत यापेक्षा कमीच अनुदान देतो. त्यामुळे भारत उलट अनुदानात वाढ करू शकतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत शेतमालाच्या किंमती भारतीय कृषीमालाची निर्यात वाढेल व त्यातून अधिकाधिक परकीय चलन मिळेल.

SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES ISSN: 2319-4766

३) **निर्यात अनुदान** : भारताचे दरडोई उत्पन्न १००० डॉलरपेक्षा कमी आहे आणि तांदूळ, चहा, मसाले आणि खडे व दागिने सोडले तर इतर सर्व वस्तूंचा भारताच्या निर्यातीत ७७ टक्के वाटा आहे. म्हणजे भारत ७७ टक्के वस्तूंच्या निर्यातीवर सबसिडी देऊ शकतो. भारत प्रत्यक्षात अशी कुठलीही निर्यात अनुदान देत नाही. केवळ निर्यातदारांना आयकर कायद्यातील ८० HHC कलमांनुसार निर्यात उत्पन्नावर करसवलत आहे. कृषि उत्पनावर आयकर माफच आहे. फळे, भाजीपाला आणि फुले उत्पादनांच्या निर्यातीसाठी सागरी जलवाहतुकीसाठी अनुदान दिले जाते.

४) **कापड आणि वस्त्र करार** : कापड व वस्त्रांच्या निर्यातीतून विकसनशील देशांना जास्त फायदा होऊ शकतो. म्हणून विकसित देशांनी कापड व वस्त्रांच्या आयातीवर कोटा पद्धत लागू केली होती. भारतीय अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणात कापड आणि वस्त्रोद्योगावर आधारलेली आहे. १/४ कुशल तसेच अकुशल लोकसंख्या कापूस आणि वस्त्रोद्योगाशी निगडीत आहे. कापड आणि वस्त्र करारामुळे भारताला मोठी बाजारपेठ मिळाली आहे. यासाठी भारताला विविध डावपेच आखून उत्पादनात वाढ करून निर्यातवृद्धी करून ही बाजारपेठ टिकवून ठेवावी लागणार आहे.

५) **पेटंट आणि भारतीय कृषीक्षेत्र** : बि–बियाणांच्या संशोधनवृत्तीला चालना मिळून नवनवीन वाणांचा शोध लावणे शक्य होईल, एकूण उत्पादन, उत्पन्न आणि रोजगारात वाढ होईल असे निष्कर्ष काढण्यात आले.

- **प्रतिकूल परिणाम :**

(१) WTO च्या धोरणानुसार भारतासारखे जे देश कृषीमालाची आयात सहसा करीत नाहीत, अशा देशांना देशातील ३% शेतमाल विकसित राष्ट्रांकडून आयात करावा लागत आहे. यामुळे भारतातील शेतमालाच्या किमती घटत आहेत व त्याचा फटका भारतीय शेतकऱ्यांना बसत आहे. उदा. कांदा, साखर, डाळी.

(२) जागतिकीकरणामध्ये लहान व सीमांत शेतकरी टिकू शकत नाहीत. त्यांच्या दारिद्र्यामध्ये वाढ होऊन मोठ्या प्रमाणात शेतकरी आत्महत्या करीत आहेत.

(३) १९९५ पासून विकसित देश देशांतर्गत मदत व निर्यात सबसिडी देत आहेत. यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत विकसित देशांतील कृषिमालाचा पुरवठा वाढल्यामुळे भारतासारख्या विकसनशील देशातील कृषिमालाला किंमत मिळत नाही.

(४) कापड व वस्त्र कराराच्या परिणामामुळे कोटा पद्धत बंद झाल्यामुळे भारताबरोबरच चीन, पाकीस्तान, बांग्लादेश, इंडोनेशिया, मलेशिया या विकसनशील देशांनाही ही बाजारपेठ मिळालेली असल्यामुळे भारताला या देशाबरोबर स्पर्धा करावी लागत आहे.

(५) बी–बियाणे साठविणे, विकणे वा पुन्हा वापरणे यांचा अधिकार शेतकऱ्यांना न राहता बहुराष्ट्रीय कंपनीला असल्यामुळे अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतीय बाजारपेठेत प्रवेश केला आहे. उदा. पायोनिअर, ओव्हरसाईज, हिंदूस्थान लिव्हर इ.

- **उद्योगक्षेत्रावर परिणाम** : राष्ट्रीय उत्पादनात उद्योग क्षेत्राचा हिस्सा २९.६% आहे. जागतिकीकरणामुळे उद्योग क्षेत्रावर पुढील परिणाम झालेले आहेत.

१) २४ जुलै १९९१ रोजी नवीन औद्योगिक धोरण जाहीर करण्यात आले. अनुसूची अ मधील १७ उद्योग क्षेत्रांवर केंद्र सरकारचा अधिकार होता. आता यामध्ये तीन क्षेत्रे सोडली तर कोणत्याही क्षेत्रात खाजगी उद्योग स्थापण्यास परवानगी आहे.

SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES ISSN: 2319-4766

२) उद्योग – दारू, मादक द्रव्यांचे कारखाने, तंबाखू–सिगारेटसारखी उत्पादने मिळवणारे उद्योग, संरक्षण उद्योग ज्वलनशील उद्योग आणि घातक रसायने सोडले तर इतर सर्व उद्योग परवानामुक्त करण्यात आले आहेत.

३) परवाना धोरणावर नियंत्रण ठेवणारा MRTP कायदा रद्द करण्यात आला. त्याऐवजी २००२ मध्ये Competition कायदा करण्यात आला आहे. म्हणजे उद्योग परवान्यावर नियंत्रण ठेवण्याऐवजी उलट उद्योग स्थापन्यावर व उद्योगांमध्ये स्पर्धा वाढीस लागण्यावर भर दिला जात आहे.

४) भारतीय उद्योगांमध्ये परकीय गुंतवणूकीस मान्यता देण्यात आली आहे. गुंतवणूकीस बाधक ठरत असलेल्या FERA ऐवजी १९९९ मध्ये सौम्य अशा FEMA कायदा अस्तित्वात आला आहे.

५) लघुउद्योगांसाठीही ६ ऑगस्ट १९९१ ला लघू उद्योगविषयक औद्योगिक धोरण जाहीर करण्यात आले.

६) भारताला उत्पादनाचे केंद्रस्थान बनविण्याच्या उद्देशाने भारतातील गुंतवणूक वाढावी व्यावसायी वातावरण निर्मिती व्हावी आणि उत्पादनात लक्षणीय वाढ व्हावी यासाठी २५ सप्टेंबर २०१४ ला 'मेक इन इंडिया' अभियान सुरू करण्यात आले आहे. एकूणच भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल मिश्र अर्थव्यवस्थेकडून मुक्त अर्थव्यवसथकडे होत आहे. जागतिकीकरणाचा उद्योग क्षेत्रांवर अनुकूल–प्रतिकूल परिणामांचा अभ्यास करण्यासाठी आपल्याला सार्वजनिक उद्योग, मोठे उद्योग, लघू उद्योग व खनिजउद्योग या पद्धतीने करावयाचा आहे.

**१) सार्वजनिक उद्योग** : १९९१ च्या उदारीकरणानंतर व जागतिकीकरणानंतर या उद्योगाचे निर्गुंतवणूकीचे धोरण राबविले जात आहे. २००४ मध्ये सार्वत्रिक उद्योगांच्या पुनर्रचनेसाठी BRPSE (Board for Reconstruction of Public Sector Enterprise) या बोर्डाची स्थापना करण्यात आली. सध्या सार्वजनिक क्षेत्रात ५ महारत्न कंपन्या १५ नवरत्न कंपन्या व ६१ उद्योगांना मिनीरत्न दर्जा देण्यात आला आहे. जे सार्वजनिक उद्योग तोट्यात चालत असतील त्यांच्या व्यवस्थापनाचा पुनर्विचार बोर्ड ऑफ इंडस्ट्रिअल अँड फायनान्सिअल रिकन्स्ट्रक्शनने करावा. नफ्यात चालणाऱ्या सार्वजनिक कंपन्यांना स्वायत्तता दिली जावी. १९९१ पर्यंत सुमारे २४६ उद्योग सार्वजनिक क्षेत्रात चालत होते व त्यात शासनाची सुमारे १३५०८ कोटीची गुंतवणूक होती ती टप्प्याटप्प्याने कमी करण्यात आली.

**२) मोठे उद्योग** : यामध्ये कापड उद्योग, लोह, पोलाद उद्योग, साखर उद्योग, ताग (ज्युट) उद्योग, सिमेंट उद्योग, खत उद्योग, कोळसा व पेट्रोलियम उद्योग, खनिज उद्योग यांचा समावेश होतो.

**३) लघू उद्योग** : अर्थव्यवस्थेत लघूउद्योगांना महत्त्व आहे भरपूर रोजगार निर्मिती संतुलित आर्थिक विकास आणि ग्रामीण क्षेत्रापर्यंत औद्योगिक विकास पोहचविण्याचे लघुउद्योग हे एकमेव माध्यम आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९९० पर्यंत लघुउद्योगांनी भारतीय अर्थव्यवस्थेत फार मोलाची कामगिरी बजावली. भारतात लघुउद्योग ४०% कारखानी मालाचे उत्पादन, ५०% रोजगार संधी देतो व ३३% निर्यात करतो. अशा लघू उद्योग क्षेत्रावर जागतिकीकरणामुळे मोठे संकट ओढवले आहे. कारण या क्षेत्राला आयात होणाऱ्या स्वस्त वस्तूंची स्पर्धा करावयाची आहे. रोजगार निर्मितीच्या बाबतीत कृषी क्षेत्रानंतर ह्या क्षेत्राचा क्रमांक लागतो. बहुराष्ट्रीय कंपन्याद्वारे

SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES ISSN: 2319-4766

आईस्क्रिम, उदबत्त्या, पेयजल इत्यादी बाबतही लघुउद्योगाला स्पर्धा करावी लागत आहे. कोका–कोला, पेप्सी ह्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या शितपेयांनी भारतातील शीत पेयाचे उद्योग बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. परंतु जागतिकीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्याच्या मालांनी स्वदेशी बाजारपेठा भरलेल्या आहेत. ह्या विदेशी मालांची गुणवत्ता उच्च दर्जाची व किंमतही कमी असल्यामुळे स्वदेशी उत्पादन ह्या विदेशी मालाच्या स्पर्धेत टिकू शकत नाही.

**४) उपभोग्य टिकाऊ वस्तूच्या उत्पादनात वाढ :** बहुराष्ट्रीय कंपन्यांनी उपभोग्य टिकाऊ वस्तूच्या उत्पादनासाठी भांडवल गुंतवणूक केली. परिणामत: उपभोक्त्यांना हव्या असलेल्या या वस्तूंच्या उत्पादनात, उपलब्धतेमध्ये व त्याच्या उपभोगात वाढ झाली. जागतिकीकरणापूर्वी भारतात स्कूटर्स मोटारीच्या उत्पादनात ३/४ कंपन्यांची मक्तेदारी होती. आता ही मक्तेदारी संपलेली आहे.

**५) भारतीय उद्योगाची पिछेहाट :** जागतिकीकरणामध्ये भारतात बहुराष्ट्रीय कंपन्या आल्या. भारतातील उद्योगांना त्यांच्याशी असमान अंशी स्पर्धा करावी लागली. बहुराष्ट्रीय कंपन्या सर्वच बाबतीत भक्कम असल्यामुळे भारतातील अनेक बड्या उद्योगांचा त्यांच्या समोर टिकाव लागला नाही. भारतातील अनेक उद्योगांची विक्री झाली. उदा. टाटा ऑईल, मिल्स, पारले, सॉफ्ट ड्रिंक्स, मॉडर्न फुडस्, हिंदूस्थान, रेमंड, स्टिल वगैरे कंपन्या विदेशी उद्योगसंस्था ताब्यात गेल्या.

**६) आजारी उद्योगधंदे व बंद उद्योगधंदे :**

जागतिकीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या स्पर्धेत भारतीय उद्योगधंद्याचा टिकाव लागला नाही. त्यामुळे अनेक उद्योगधंदे बंद झाले. भारतामध्ये २००१–०२ मध्ये चालू कारखान्यांची संख्या १,२८,५४९ होती. त्यात २००२–०३ मध्ये १,२८,०३९ इतकी घट झाली. वरीलप्रमाणे जागतिकीकरणाचे काही लाभ असले तरीही सार्वजनिक खर्चात घट झाल्यामुळे गरीब वर्गाला मिळणाऱ्या आर्थिक सहाय्यामध्ये कपात करावी लागली. आयाती स्वस्त व निर्याती महाग झाल्याने शोधन शेषावर प्रतिकूल परिणाम झाला. जागतिकीकरणाला सुरूवात झाल्यापासून सार्वजनिक क्षेत्रातील पाणीपुरवठा व वीज पुरवठासारख्या आवश्यक असणाऱ्या सेवांचे खाजगीकरण होत आहे. श्रीमंत वर्गातील आर्थिक विषमतेच्या दरीत वाढ होत आहे. जागतिकीकरणामुळे स्वदेशी उद्योगांना धोका निर्माण होत आहे.

**सारांश :** अशा प्रकारे जागतिकीकरणाचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम आपण अभ्यासले. भारताने जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत टिकून राहून आपली प्रगती करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. भारतीय कृषीक्षेत्र जागतिकीकरणाच्या कशा पद्धतीने टिकून राहील यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे उद्योगप्रियता, उद्योजकता व श्रमसंस्कृती यांचा अंगिकार प्रत्येक भारतीय व्यक्तिने केल्यास जगाच्या पाठीवर भारत हा एक आर्थिक महासत्ता म्हणून नक्कीच उदयास येईल.

**संदर्भग्रंथ सूची :**

*१) अर्थसंवाद; भारतीय अर्थव्यवस्था विशेषांक; एप्रिल–जून २०१२, खंड ३६, अंक.*

*२) स्मरणिका अर्थविश्व, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३५ वे राष्ट्रीय अधिवेशन, नोव्हेंबर २०११.*

*३) दुबे अभयकुमार, (२००३) : भारत का भूमंडलीकरण, वाणी प्रकाशन नई दिल्ली.*